# श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज

गनिमांच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा ।
ऐसा पाहिजे की राजा । कैपक्षी परमार्थी ।।

श्री शिवशक ३५१ आश्विन शुद्ध एकादशी (दि. ३ ऑक्टोबर २०२४)



मासिक
## ऋतुपर्ण

सोहम क्रिएशन ॲन्ड पब्लिकेशन, पुणे

।।श्रीराम समर्थ।।

मासिक

# ऋतुपर्ण

# श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज

## विशेषांक



सोहम क्रिएशन अ‍ॅन्ड पब्लिकेशन, पुणे

# सोहम क्रिएशन ॲन्ड पब्लिकेशन, पुणे

**- संपादक -**

सुरेंद्र गोगटे

**- संपादन सहाय्य -**

श्री. मधु नेने, डॉ. अनुराधा कुलकर्णी,

श्री. माधव विद्वांस, ॲड. सौ. स्नेहा गोगटे

**- मुद्रक -**

मार्लेश्वर ग्राफिक्स, पुणे

**- मुखपृष्ठ, अक्षरजुळणी, मांडणी व सजावट -**

सोहम क्रिएशन ॲन्ड पब्लिकेशन, पुणे

**- प्रकाशन दिनांक -**

।। श्री शिवशक ३५१ आश्विन शुद्ध एकादशी ।।

शालीवाहन शक १९४६

दिनांक ३ ऑक्टोबर २०२४

**मूल्य रु. ३००/-**

ऋतुपर्ण **'श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक'** हे मालक व संपादक सुरेंद्र गोगटे यांनी मार्लेश्वर ग्राफिक्स, पुणे येथे छापून सोहम क्रिएशन ॲन्ड पब्लिकेशन, शॉप नं.१, प्रथमेश अपार्टमेंटस्, स.नं.१५ माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे - ४११ ०५१. मो. ८६०५५६७६५७ येथे प्रसिद्ध केले.



ऋतुपर्ण 'श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज विशेषांकात' प्रसिद्ध केलेले सर्व लेख व लेखातील मते इतिहासातील संदर्भ व नोंदी तपासून लेखकांनी व्यक्त केलेली आहेत, लेखकांची मते वैयक्तिक असून संपादक सहमत असतीलच असे नाही.

# शिव लेखावली


लोकपालक राजा : शिवछत्रपती — डॉ. सो.रा. शेंडे — १५

शिवरायांची समकालीन सामाजिक परिस्थिती — डॉ. प्रदीप पाटील — २१


शिवशाहीची राज्यघटना : आज्ञापत्र! — ॲड. सौरभ देशपांडे — ४१

गोमंतकातील शिवशाहीचे प्रमाण : शर्तनामा आणि शिलालेख — डॉ. विनय मडगांवकर — ४७

लेखनप्रशस्ती आणि राज्यव्यवहारकोश — श्री. आदित्य चौंडे — ५५

शिवछत्रपतींची पत्रे — डॉ. अनुराधा कुलकर्णी — ६१

प्रजासत्ताक मूल्ये आणि शिवाजी महाराज — प्रा. विनय बापट — ७१

# प्रजासत्ताक मूल्ये आणि शिवाजी महाराज

**प्रा. विनय बापट**



**परिचय – गोवा विद्यापीठातील, 'शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळेत' एप्रिल २०२० पासून अध्यापनाचे कार्य. सध्या 'मराठी अध्ययनशाखा संचालक' (Program Director) म्हणून कार्यरत. धेंपे कला आणि विज्ञान महाविद्यालय मिरामार–पणजी, येथे मराठी विषयाचा अध्यापक म्हणून वीस वर्षे कार्य. 'बागीतलं घर', 'माती आणि माणसं' हे ललित लेखांचे संग्रह प्रसिद्ध. मो. ९७६४१७१२५६**

प्रजासत्ताक ही आधुनिक विचारांतून अवतरलेली एक राज्यपद्धती आहे असे आपणाला वाटते किंबहुना अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध आणि फ्रेंच राज्यक्रांतीनंतर ही लोकशाही शासनप्रणाली म्हणून समोर आली असेही म्हटले जाते. परंतु थोडे इतिहासात डोकावण्याचा प्रयत्न केल्यास प्राचीन काळातही प्रजासत्ताक पद्धती अस्तित्वात होती आणि त्याचे मूळ आपला देश आहे याची माहिती मात्र क्वचित काहींनाच असेल. काही ऐतिहासिक पुराव्यानुसार इसापूर्व ६०० वर्षे आजच्या हिमालयाच्या पायथ्याशी वैशाली हे पहिले गणराज्य म्हणून अस्तित्वात आले होते. लिच्छवीयों समुदायाच्या लोकांनी ते स्थापन केले होते. आजच्या संसदीय परंपरेत ज्याप्रमाणे सामान्य सभागृह, उच्च सभागृह असे विभाग असतात तसे या गणराज्यात देखील होते. त्या ठिकाणी छोट्या–छोट्या लोकसमित्या होत्या, ज्या प्रशासनाचे संचालन करीत असत. तेथील जनतेसाठी कायदे करीत असत आणि त्याची अंमलबजावणी देखील करीत असत.

लोकशाही किंवा प्रजासत्ताक या अशा व्यवस्था आहेत ज्या व्यवस्थेत प्रजा किंवा प्रजेतून निवडून आलेले प्रतिनिधी त्या प्रदेशाचा राजकारभार पाहात असतात. भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर भारतातही अशीच लोकशाही प्रजासत्ताक पद्धती अस्तित्वात आली. म्हणूनच आज भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असल्याचे आपण अभिमानाने सांगतो. लोकशाही व्यवस्थेत लोकांचे हित सर्वतोपरी असते व नागरिकांचे स्वातंत्र्य जपण्याची हमी ही शासनव्यवस्था देते. राजेशाही, हुकूमशाही याला पर्याय म्हणून अस्तित्वात आलेली ही राज्यपद्धती आहे. शुद्ध लोकशाहीत प्रत्येक गोष्ट सामान्य जनतेला विचारूनच केली जाते परंतु ही पद्धती अनेक दृष्टीने गैरसोयीची देखील ठरते. तसेच बहुसंख्यांच्या बळावर अल्पसंख्यांकांची वा त्यांच्या अधिकारांची कोंडी होणे शक्य असते. प्रजासत्ताक व्यवस्थेत जनतेतून जनतेचे प्रतिनिधी निवडले जातात व हे प्रतिनिधी कायदे तयार करतात, शासनदेखील तेच चालवतात. या पद्धतीत अल्पसंख्यांकाचे अधिकार देखील बऱ्याच प्रमाणात सुरक्षित राहतात.

प्रजेचा सर्वांगीण विकास हेच सुशासनाचे मूलतत्त्व आहे. जेव्हा सर्वसामान्य जनतेला विकासाचा

केंद्रबिंदू मानून त्यांचा सहभाग ही व्यवस्था चालवण्यासाठी घेण्यात आला होता तेव्हा त्या राज्याने सफलतेची आणि समृद्धीची शिखरे गाठली होती, हे आपल्याला इतिहासात दिसून येते. प्रजेला सहभागी करून घेतल्यावाचून कोणत्याही राज्याच्या विकासाचे स्वप्न साकार होत नाही. आपल्या देशातील सर्वच महानायकांनी हे तत्त्व उत्तम प्रकारे जाणून घेतले होते. या संदर्भात शालिवाहन राजाचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. त्याने मातीच्या सैनिकांमध्ये प्राण फुंकून त्यांना जिवंत केले व त्यांच्या सहयोगाने शत्रूचा पराभव करून स्वतःचे राज्य निर्माण केले अशी कथा सांगितली जाते. मातीच्या सैनिकांमध्ये प्राण फुंकून त्यांना जिवंत केले व त्यांच्या सहाय्याने युद्ध केले हे प्रतिकात्मक म्हणून घेतले व मातीचे सैनिक म्हणजे सामान्य जनता असा अर्थ घेतल्यास सामान्य माणसात राष्ट्रभाव जागृत करून त्यांच्या साहाय्याने स्वतःचे राज्य प्रस्थापित केले असे म्हणता येईल म्हणजे शालिवाहनाचे राज्य हे लोकशाही मूल्यांनी प्रेरीत होते असे म्हणण्यास वाव आहे.

मध्ययुगात भक्ती साहित्याची जी चळवळ आणि परंपरा संपूर्ण भारतात निर्माण झाली त्याच्या मूळापाशी देखील लोकशाही परंपरेची तत्त्वेच होती असे म्हणता येते. महाराष्ट्रासंदर्भात विचार करीत असताना, 'संतानी महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाहीची स्थापना केली' असे म्हटले जाते. साहित्य निर्मिती ही जरी शासन व्यवस्था नव्हती तरी शासन व्यवस्थेला मार्गदर्शन करणारी ती चळवळ होती असे आपण निश्चितच म्हणू शकतो. संतांनी समतेची गुढी आध्यात्मिक क्षेत्रात रोवली ही खूप मोठी घटना आहे. त्यांनी मुक्तीची संकल्पना सर्व जातीवर्णातील लोकांसाठी आणि स्त्रियांसाठी देखील आहे हे ठामपणे सांगून या भूमीत लोकशाही मूल्यांची प्रतिष्ठापना केली असे देखील म्हणता येते. छ. शिवाजी महाराजांचा जन्म देखील संतांचे संस्कार असलेल्या या महाराष्ट्रात भूमीत झाला हे या ठिकाणी मुद्दामहून नमूद केले पाहिजे. व्यवस्था चांगली पाहिजे कारण चांगल्या शासन व्यवस्थेतून सुशासनाची व्यवस्था निर्माण होते. जे शासन त्या राज्यातील जनतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करते, त्या व्यवस्थेवर ती एक स्नेहभाव सामान्य माणसाच्या मनात जागत असतो. यातूनच 'हे राज्य माझे आहे' ही भावना मनात जागृत होत असते. राजेशाही किंवा हुकूमशाही ही एकाधिकारशाही असल्याने सामान्य माणसाच्या आकांक्षांचे चित्रण त्यातून होणे शक्य नसते. परंतु लोकशाही पद्धतीत जनतेतूनच प्रतिनिधी निवडले जात असल्याने सामान्य जनतेच्या आशा-आकांक्षांचे दर्शन त्यातून सहजतेने घडते असे आपणाला म्हणता येते तसेच, आपल्या आकांक्षांची पूर्तता न झाल्यास आपले प्रतिनिधी बदलण्याची सोय देखील या शासन प्रणालीत असते. अर्थात अपवादात्मकरित्या राजेशाहीत देखील सामान्य माणसांच्या भावनांचा विचार करून शासन चालवले जात होते असे दिसून येते. 'रामराज्य' ही संकल्पना या संदर्भात तपासून पाहता येण्यासारखी आहे. एका धोब्याने सीतेच्या चारित्र्यावर शंका घेतली म्हणून रामाने तिला जंगलात पाठवणे या गोष्टीचा संदर्भ या संदर्भात तपासता येईल. सुशासनाची व्याख्या करणे अत्यंत अवघड आहे. काहींच्या मते, सुशासन म्हणजे न्यायप्राप्ती, सबलीकरण, रोजगारनिर्मिती आणि लोकसेवेला वाहिलेली एक सुव्यवस्था होय, तर काहींच्या मते हे व्यापारउद्योग, राज्यव्यवस्था आणि समाज यांना एकत्रित बांधून ठेवणारे सूत्र आहे.

न्याय्य आचरणाची हमी, जबाबदारीचे वर्तन, पारदर्शक व्यवहार, समभाव, मानवाधिकाराचा आदर करणारी व्यवस्था असाही आपण सुशासनाचा अर्थ लावू शकतो. भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीता सांगताना जो राज्य कसे चालवावे याचा उपदेश केला आहे ते सुशासनाचा वस्तुपाठच आहे. 'चांगला शासक तोच जो जनतेचे हित जाणतो' असे कौटिल्याने

आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात म्हटले आहे.

आशियाई विकास बँकेच्या मते जबाबदारीचे वर्तन, पारदर्शक व्यवहार, पूर्वानुमान क्षमता आणि जनसहभाग हे सुशासनाचे चार घटक आहेत. हे निकष लावून आपण छ. शिवाजी महाराजांचे राज्य हे प्रजासत्ताक होते का? याचा शोध घेतला पाहिजे. एक गोष्ट नक्की, आज आपण प्रजासत्ताकाची व्याख्या ज्याप्रमाणे करतो तशी प्रजासत्ताक व्यवस्था छत्रपती शिवाजी महाराजांनी राबवली नाही हे नक्कीच आहे कारण ती एक राजेशाही पद्धती होती म्हणूनच त्यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा सिंहासनावर बसला. पण छत्रपतींचे स्वराज्य हे सामान्य माणसाला आपले वाटत होते हे निःसंशयपणे खरे आहे. त्यामुळेच, कोणती प्रजासत्ताक मूल्ये महाराजांच्या राज्यव्यवस्थेत होती, याचा शोध औत्सुक्याचा ठरतो. प्रत्यक्षातील सुशासन हे तात्विक चर्चेपेक्षा वेगळे असते. सुशासनाचा सर्वसामान्य माणसांच्या जीवनावर थेट परिणाम दिसून येणे महत्वाचे असते. या सर्व गोष्टी छत्रपतींपेक्षा आणखी कोणालाही चांगल्या प्रकारे समजून घेणे शक्य झाले होते असे वाटत नाही, महाराजांनी सुशासनाच्या विविध संकल्पना या आपल्या राज्यपद्धतीचा अविभाज्य भाग मानल्या होत्या व त्या अनुषंगानेच त्यांचा राज्यकारभार सुरू होता असे दिसून येते. एका आदर्श शासकाकडे आवश्यक असणाऱ्या सर्व गुणांचा समुच्चय महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्याच बळावर त्यांनी मावळ्यांना एकत्रित करून परकी शासनव्यवस्थेविरोधात संघर्ष करण्याची प्रेरणा दिली व त्यायोगेच हिंदवी स्वराज्य स्थापन केले. महाराजांच्या एकूण राजकारभारावर लक्ष दिल्यास प्रजेचे हित हे त्यांनी सर्वोपरी मानल्याचे दिसते. त्यांनी जे विविध निर्णय घेतले त्यावरून हे प्रकर्षाने दिसून येते. हे राज्य प्रजेचे आहे आणि प्रजेचा सेवक म्हणून मी त्याचा शासक आहे हीच भावना छत्रपतींची असल्याचे दिसते. 'राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा ' हे त्यांचे उद्गार देखील हेच सूचित करतात. 'निःस्वार्थ वृत्तीचा जननायक' हीच त्यांची जनसामान्यांच्या हृदयातील प्रतिमा आजही आहे. स्वातंत्र्य, समता, बंधूता ही लोकशाही तत्त्वे आहेत आणि ती फ्रेंच राज्यक्रांतीनंतर उदयाला आली असे मानले जाते परंतु ही तत्त्वे महाराजांच्या शासनातील महत्त्वाचा भाग होती असे दिसून येते. काही घटनांचा आढावा घेऊन त्यांचे राज्य हे लोकशाही तत्त्वांची बूज राखणारे होते हे सिद्ध करता येण्यासारखे आहे.

शिवरायांच्या राज्यात तत्कालीन गोव्यातून म्हणजे पोर्तुगीज राज्यातून येणारे मीठ स्थानिक मिठापेक्षा स्वस्त मिळू लागले. तेव्हा स्थानिक व्यापाऱ्यांचे हित जपण्यासाठी त्यांनी बाहेरून आणल्या जाणाऱ्या मिठावर जादा कर लावला व ते स्थानिक मिठापेक्षा स्वस्त दरात विकले जाणे शक्य नाही याची काळजी घेतली. या संदर्भात त्यांनी १६७१ मध्ये लिहिलेले पत्र उपलब्ध आहे. शेती हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता. त्यामुळे शेती व्यवसाय निगुतीने चालेल यासाठी शिवाजी महाराजांनी अण्णाजी दत्तो यांना आदेश देऊन एक योजना बनवून घेतली होती. ज्यामध्ये प्रत्येक गावातील शेतजमिनीची मोजणी करणे, पीकपाण्याची मोजणी करणे, दुष्काळाच्या काळात नुकसानीचा अंदाज घेणे आणि त्यानुसार शेतसारा ठरविणे वा नुकसानभरपाई द्यायची असल्यास ती या मोजणीच्या आधारे देणे शक्य होत असे. ही मोजणी करण्यासाठी तीन शासकीय अधिकारी, गावोगावचे पाटील, देशमुख आणि देशपांडे तसेच चार प्रमुख शेतकरी असत. ही प्रजासत्ताक व्यवस्था होती असेच म्हणावे लागेल कारण या समुहात चार शेतकरी प्रतिनिधी असत व त्यांच्या मतानुसार सर्व ठरवले जात असे. मोठा दुष्काळ पडत असे तेव्हा किंवा संकटाच्या वेळी, कोणत्याही कारणाने शेतकऱ्यांना नुकसान झाल्यास त्यांना नुकसानभरपाई देण्याची व्यवस्था होती. बैल मरण

पावल्यास नवीन बैल देणे, दुष्काळामुळे नुकसान झाल्यास पेरणीसाठी पुन्हा धान्य देणे, नांगर अथवा शेतीसाठी आवश्यक अवजारांचे नुकसान झाल्यास ती देणे अशी मदत दिली जात असे परंतु आर्थिक स्वरूपाची मदत दिली जात नसे. अशी मदत दिल्यास शेतकरी तो पैसा दुसऱ्या कामासाठी वापरतात व शेतीसाठी पैसा उरत नाही हे त्यांनी लक्षात घेतले होते. आजच्या राज्यकर्त्यांनी देखील छत्रपतींचा आदर्श घेण्यासारखा आहे. पावसाच्या दिवसात सैनिकांना शेती करण्यास पाठवले जात असे. अर्थात आज हे शक्य नसले तरी रिकामटेकडे राहण्यापेक्षा प्रत्येकाने श्रम करणे याला छत्रपतींनी त्याकाळी दिलेले महत्त्व आपल्या लक्षात येते. यातून सैनिक म्हणजे कोणी मोठा नाही तो देखील चारचौघांसारखाच आहे हा जो संदेश जात असे तो प्रजासत्ताक मूल्यांच्या संदर्भात महत्त्वाचा होता. आजच्या काळाचा विचार करता त्याकाळी समाज हा जास्त अंधश्रद्धाळू होता असे निश्चितच म्हणता येते परंतु शिवाजी महाराजांनी अंधश्रद्धांना तिलांजली देऊन दूरदृष्टी ठेवून स्वराज्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी केल्या असे दिसते. समुद्रबंदीची खुळचट कल्पना मोडीत काढून त्यांनी आरमाराची उभारणी केली. भारतीय राज्यघटनेत देखील हा वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करण्यावर भर दिलेला दिसतो. छत्रपतींनी ते त्याकाळात स्वकृतीने करून दाखवले होते. महाराज हे प्रजासत्ताक मूल्यांची चाड राखणारे होते हे त्यांच्या आणखी एका कृतीतून सिद्ध होते. व्यापार उद्योग वाढला पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता परंतु त्यासाठी मानवी मूल्यांशी त्यांनी कधीही समझोता केला नाही. डच प्रतिनिधींसोबत व्यापार करार करताना त्यांनी ही महत्त्वाची अट घातली होती की, त्यांना गुलामांचा व्यापार अजिबात करता येणार नाही. यावरून मानवी मूल्यांच्या संरक्षणाची किती सूक्ष्म जाणीव महाराजांना होती याची साक्ष आपणाला पटते. आज हीच मूल्ये प्रजासत्ताक व्यवस्थेच्या मुळाशी आहेत.

आपल्या सैन्याची व त्यांच्या परिवाराची काळजी जेवढी छत्रपती शिवाजी महाराज घेत होते तेवढी काळजी समकालीन कोणत्याच राजाने घेतली नसावी. युद्धात जे सैनिक वीरगतीला प्राप्त होत असत त्यांच्या विधवा पत्नीला आयुष्यभर त्या सैनिकाचे जे वेतन असे त्याच्या अर्धे वेतन दिले जात असे. गंभीर दुखापत झालेल्या सैनिकांना देखील नुकसानभरपाई दिली जात असे. एका अर्थाने छत्रपतींनी त्याकाळी दिलेली ही 'सामाजिक सुरक्षाच' होती.

छत्रपतींच्या राज्यातील आणखी काही नियम होते जे आदर्श राज्याचे महत्त्वाचे स्तंभ म्हणून पाहता येतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराजांनी प्रशासन आणि लष्कर हे एकमेकांपासून वेगळे केले होते. तत्कालीन ज्या ज्या राजेशाही पद्धती अस्तित्वात होत्या त्या सर्वांमध्ये लष्कराला अमर्याद अधिकार होते. प्रशासनातही लष्कराचा हस्तक्षेप असल्याचे दिसते. परंतु महाराजांनी प्रशासकीय व्यवस्थेत लष्कराचा अजिबात हस्तक्षेप होणार नाही याची काळजी घेतली. सैनिकांना गावातून कोणाकडूनही धन किंवा धान्य गोळा करण्याचा अधिकार नव्हता, प्रत्येक प्रांत हा त्या ठिकाणी नेमलेल्या सुभेदाराच्या अखत्यारीत येत असे आणि लष्करी अधिकाऱ्यांना त्यात अजिबात हस्तक्षेप करता येत नसे. या संदर्भात त्यांचे एक पत्र महत्त्वाचे आहे. आपल्या सुभेदाराला लिहिलेल्या या पत्रात ते म्हणतात, ''आपण रयतेला त्रास द्याल, त्यांची योग्य देखभाल न करता (अर्थात कार्याची अंमलबजावणी करताना लाच मागाल) तर यापेक्षा मुघलांचे राज्य परवडले असे त्यांना वाटेल व प्रजा हैराण होईल.'' जनतेची किती काळजी महाराज करीत असत हे यावरून सिद्ध होते.


ज्या ज्या ठिकाणी सैन्याचा प्रशासनातील हस्तक्षेप वाढतो तेव्हा तेव्हा हुकूमशाही निर्माण होते. महाराजांचे राज्य हे राजेशाही पद्धतीने चालणारे असले

तर हुकुमशाही पद्धती अजिबात रुजणार नाही याची काळजी महाराजांनी घेतली होती. वतनदार वृत्ती वाढणार नाही याची काळजी ते घेत असत म्हणूनच वतने देण्याची पद्धत त्यांनी बंद केली होती. कारण ही वतने म्हणजे जनतेच्या शोषणाची केंद्रे होतात हे त्यांनी जाणले होते. आज्ञापत्रात यासंबंधीचे उल्लेख स्पष्टपणे सापडतात. यावरून आपल्या प्रजेबद्दलचा केवढा कळवळा व प्रेम त्यांच्या मनात होते हे लक्षात येते. शिवाजी महाराजांना केवळ पन्नास वर्षांचे आयुष्य लाभले त्यातील साधारणतः ३६ वर्षे त्यांचे आयुष्य हे राजकीय कर्तृत्वाचे असे म्हणता येते. त्यातील जवळ जवळ १०-११ वर्षे ही राज्याच्या विस्ताराच्या दृष्टीने विविध मोहीमा आखण्यात, युद्धे लढण्यात गेली आणि उर्वरित काळ हा शासनयंत्रणा उभारण्यात गेला. ही व्यवस्था उभारताना जनतेचे हित त्यांनी सर्वतोपरी मानले असेही दिसून येते. युद्ध लढताना देखील आपल्या सामान्य प्रजेला त्याची कमीतकमी झळ बसेल याची काळजी महाराज घेत होते हे लक्षात येते. अगदी आरमाराला आवश्यक असणारी लाकडे मिळवताना देखील आंबा, फणस अशी लोकांच्या उपयोगी पडणारी झाडे मारू नयेत कारण ही झाडे लोकांनी आपल्या लेकराप्रमाणे वाढवलेली असतात, ती तोडल्यास जनतेच्या मनात आपल्या राजकीय वा प्रशासनिक व्यवस्थेबद्दल द्वेषाची भावना जागृत होते. त्यामुळे एखादे झाड हवेच असेल तर त्याचा योग्य तो मोबदला देऊन ते घ्यावे असे महाराजांचे स्पष्ट आदेश होते. हे तोच राजा करू शकतो ज्याच्या मनात आपल्या प्रजेबद्दल आत्यंतिक प्रेम आहे. म्हणूनच शिवाजी महाराजांचे राज्य हे लोकशाही मूल्यांची कदर करणारे होते असे म्हणता येते. शिवाजी महाराजांचे राज्य हे लोकसत्ताक मूल्यांना पोषक होते असे का म्हणायचे? असा प्रश्न निर्माण केल्यास महाराजांनी हे माझे राज्य आहे असे चुकूनही कधी म्हटल्याचे आढळत नाही. 'राज्य व्हावे ही श्रींची इच्छा' असे म्हणत हे राज्य आपले आहे हा भाव त्यांनी सामान्यातल्या सामान्य माणसाच्या हृदयात जागृत केला. सगळा भारत ज्याच्या ताब्यात होता तो औरंगजेब शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे राज्य बुडविण्यासाठी स्वतः दक्षिणेत का उतरला याचा विचार केला असता, शिवाजी महाराजांचे राज्य हे तेथील जनतेला आपले राज्य वाटते आणि म्हणूनच ते प्राणपणाने लढण्यास सिद्ध होतात हे त्याने पाहिले होते आणि म्हणूनच ही भावना वाढत गेल्यास आपल्या सत्तेला सुरूंग लागल्याशिवाय राहणार नाही याची जाणीव झाल्यामुळेच तो दक्षिणेत उतरला असे निश्चित म्हणता येते. शिवाजी महाराज लोकांशी कसे वागत असत हे पहायचे असेल तर कॉस्मा थ गार्द काय लिहितो हे बघितले पाहिजे. तो म्हणतो, ''ते लोकांशी इतक्या प्रामाणिकपणे वागत असत, की प्रत्येक व्यक्ती त्यांच्याकडे प्रेम आणि विश्वासाच्या नजरेने पाहत असे. त्यांच्या प्रजेने त्यांच्यावर अपार प्रेम केले. एखाद्याला पुरस्कार द्यायचा असो अथवा दंड करायचा असो, शिवाजी नेहमीच निष्पक्षपणे निर्णय करीत. त्यांच्या जीवनकाळात कोणत्याही योग्य माणसाला पुरस्कार मिळाला नाही अथवा कोणत्याही दोषी माणसाला दंड मिळाला नाही असे झाले नाही. हे सर्व कार्य त्यांनी अत्यंत सहजपणे आणि साधेपणाने केले. त्यांनी आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना अशी सूचना दिली की, राज्याच्या सैनिकांच्या वागणुकीबाबत नेहमी त्यांनी लेखी माहिती पुरवीत जावी. विशेषतः जेव्हा त्यांना उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सैनिकाची माहिती कळत असे तेव्हा ते त्याला लागलीच चांगले पद अथवा रोख रक्कम देऊन त्याचा गौरव करीत असत. त्यामुळे धाडसी व चांगले कार्य करणारे सर्वजण त्यांच्यावर निष्कपट प्रेम करीत असत.'' हे पत्रच आपणाला सांगते, राजा असूनही लोकशाही मूल्यांची जपणूक करणारा असा हा शासक होता.

शिवाजी महाराजांचे राज्य हे जरी राजेशाही

पद्धतीने चालणारे असले तरी ते जनतेच्या इच्छा आकांक्षा लक्षात घेऊन स्थापन झालेले राज्य होते. किंबहुना सामान्य माणसांच्या आशाआकांक्षाचे प्रतिनिधित्व ते करीत होते असे म्हणता येते. हे राज्य सत्तास्थापनेच्या लालसेने नव्हे तर जनतेच्या कल्याणाचा विचार करून स्थापन झालेले होते. शिवाजी महाराजांच्या शासन व्यवस्थेत निर्णय सामुहिकरित्या विचारविनिमय करून घेतले जात असत हे देखील या ठिकाणी मुद्दामहून नोंद केले पाहिजे. लोकसत्ताक किंवा प्रजासत्ताक पद्धती ही जगातील आदर्शवत पद्धती म्हणून आज सगळेचजण मान्य करीत असले तरी जवळजवळ तीनशे वर्षांपूर्वी प्रजासत्ताक भावनेतून निर्माण झालेले हिंदवी स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराज नावाच्या द्रष्ट्याने निर्माण केले होते ही आम्हा समस्त भारतीयांसाठी अभिमान वाटावा अशी गोष्ट आहे.

***




With Best Compliments from

Shree

LIFE:MANTRA

REDEFINED PROSPERITY

Vinayak Deshpande

9823199718

Mutual Funds, Life Insurance, Health Insurance

licvinayak@gmail.com